# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### वैयक्तिक अनुदान योजनांमधील लाभार्थ्यांची चुकीच्या पध्दतीने होत असलेली चौकशी थांबविण्याबाबत

**(१) ६४०३ (२७-०१-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ, श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैयक्तिक अनुदान योजनांमधील लाभार्थ्यांच्या घरोघरी जाऊन सुरु असलेली अन्यायकारक चौकशी थांबवा या मागणीसाठी कागल तालुका तहसिलदार कार्यालयावर दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास स्थानिक जनतेने मोर्चा काढून आपल्या मागण्याचे निवेदन तहसिलदार यांना दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाचे सविस्तर मागण्याचे स्वरुप कोणते,

(३) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१७-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) कागल तालुक्यातील श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेच्या लाभार्थ्यांची चुकीच्या पध्दतीने सुरु असलेली तपासणी बंद करण्याबाबत निवेदन दिले होते.

(३) प्रस्तुत प्रकरणी दिनांक २६/१०/२०१० व दि.५/१२/२०१२ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळमेश्वर (ता.जि.नागपूर) तालुक्यातील मुलींच्या वसतीगृहाचे बांधकाम करण्याबाबत**

**(२) १७०४४ (०२-०९-२०१५). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमेश्वर (ता.जि.नागपूर) येथील समाजकल्याण विभागांतर्गत मुलींच्या वसतीगृहांच्या बांधकामासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मुलींच्या वसतीगृहाचे बांधकाम निर्धारित वेळेत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले (०७-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण झाले असून सार्वजनिक बांधकाम विभागाव्दारे दि.२७/१२/२०१८ रोजी वसतीगृह इमारत विभागाच्या ताब्यात घेण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उदगीर (जि.लातूर) येथील बाजार समितीने दुकानाच्या**
**गाळे बांधकामात केलेला गैरव्यवहार**

**(३) २११२० (२३-०९-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) येथील दुसऱ्या क्रमांकाची बाजार समिती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बाजार समितीने दुकानाचे गाळे बांधकामात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहार प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संचालक मंडळाने केलेल्या गैरव्यवहाराबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख (०१-०२-२०१९) :** (१) नाही. तथापि, अन्य बाबतीत अनियमितता आढळून आल्यामुळे फेरतपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(२) व (३) बाजार समितीच्या लेखापरिक्षणात अनियमितेबाबत त्रोटक व संदिग्ध स्वरूपात शेरे आहेत. त्यामुळे सदर संदिग्धता दूर करण्यासाठी फेरलेखापरिक्षण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तथापि, सदर आदेशाविरूध्द बाजार समितीने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून मा.न्यायालयाने "जैसे-थे" परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश दिल्यामुळे बाजार समितीचे फेरलेखापरिक्षण अद्याप पर्यंत पुर्ण झालेले नाही.

---

**सिंदखेडराजा (जि.बुलडाणा) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत**

**(४) २२३२५ (२३-०९-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा (जि.बुलडाणा) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे खर्च दरवर्षी सरासरी १८ लाख रुपये असुन उत्पन्न केवळ ९ लाख रुपये आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचा ११ कर्मचाऱ्यांचा गत ८ ते ९ महिन्यांपासून वेतन थकीत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख (०१-०२-२०१९) :** (१) नाही. या बाजार समितीचे मागील तीन वर्षाचे सरासरी उत्पन्न रू.२१,५०,५४५/- व सरासरी खर्च रू.२४,६५,५१५/- एवढा आहे.

(२) होय.

(३) व (४) जालना व देऊळगाव राजा या दोन मोठया बाजार समित्या भौगोलिकदृष्टया जवळ असल्यामुळे सिंदखेड-राजा बाजार समितीत शेतमालाची आवक व पर्यायाने उत्पन्न कमी आहे. उत्पन्न वाढीसाठी खरेदीदारांना बाजार समितीच्या आवारात जागा उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यामुळे उत्पन्नात वाढ झालेली आहे. तथापि, सदर वाढ पुरेशी नसल्यामुळे सिंदखेड राजा या बाजार समितीचे देऊळगाव राजा या बाजार समितीमध्ये विलिनिकरण करण्याबाबत कार्यवाही सुरू करण्यात येत आहे.

---

**जळगाव जिल्हयातील ठेवीदारांच्या ठेवी परत मिळण्याबाबत**

**(५) २५२८८ (०८-१०-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील ८० पतसंस्थाच्या ४९८ संचालकांवर २८८ कोटी ९७ लक्ष रुपयांची जबाबदारी जिल्हा उपनिबंधकांनी निश्चित केल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जबाबदारी निश्चित केलेल्या संचालकांना नोटीसा बजावण्यात येवून मालमत्तेचा लिलाव करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रक्कम वसुल करण्याबाबत शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१९) :** (१) होय,

(२) व (३) होय.

जळगाव जिल्हयातील अडचणीतील एकूण पतसंस्थांची १८१ आहे.

त्यापैकी संबंधित निबंधकांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी आदेशीत केलेलया पतसंस्थांची संख्या ७६ आहे.

त्यापैकी चौकशी पूर्ण झालेल्या पतसंस्थांची संख्या ६१ आहे. सदर चौकशीत नियुक्त प्राधिकृत अधिकारी यांनी जबाबदारी निश्चित केलेल्या जबाबदार व्यक्तिंची संख्या ५५७ असून निश्चित केलेल्या जबाबदारीची रक्कम रु. २९४७२.३४ लाख इतकी आहे.

संबंधित निबंधकांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९८ अन्वये निर्गमित केलेल्या वसुली प्रमाणपत्रांच्या अनुषंगाने जबाबदारी निश्चित केलेल्या संचालक व व्यक्तिकडून वसुलीसाठी संबंधित संस्थांच्या विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेकडून संबंधित व्यक्तिच्या स्थावर मालमत्तांवर संस्थेच्या नावे जप्ती बोजा बसविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) जबाबदारी निश्चित केलेल्या संचालक व व्यक्तीकडून संबंधित संस्थांच्या विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी वसुल केलेली रक्कम रु.२३६.४२ लाख इतकी आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयातील रमाई घरकुल योजनेअंतर्गत असलेले तांत्रिक मनुष्यबळ सेवा समाप्त करण्याबाबत

**(६) २७३२३ (०२-०९-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रमाई घरकुल योजने अंतर्गत बुलढाणा जिल्हयातील १६ हजार ६२१ घरकुलांचे काम अद्यापही प्रलंबीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांचे पत्र क्र.बार्टी/तांशा/रघयो/प्रकरण क्र.०५/६२१/२०१५ दिनांक २६ मे, २०१५ नुसार बुलढाणा जिल्हयातील रमाई घरकुल योजनेअंतर्गत असलेले तांत्रिक मनुष्यबळ सेवा समाप्त करण्यात येत असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेअंतर्गत कंत्राटी मनुष्यबळ सेवा समाप्त केल्यास घरकुलाचे कामे वेळेत पुर्ण होणार नाही तसेच सन २०१५-१६ करीता १० हजार घरकुलाचे उद्दीष्ट पुर्णत्वास जाणार नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर सेवा रद्द करु नये याबाबत जिल्हाधिकारी यांनी शासनास शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. राजकुमार बडोले (०७-०२-२०१९) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) होय.

जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बुलढाणा यांचे दि.२/६/२०१५ अन्वये शासनास शिफारस करण्यात आलेली आहे.

(५) राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामविकास विभागाच्या दि.२५/९/२०१८ अन्वये बाह्य यंत्रणेकडून १६०० ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांची पदे मंजूर केली असून त्यानुसार योजनेची अंमलबजावणी सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष सामाजिक समता व न्याय वर्ष म्हणून साजरा करण्याबाबत**

**(७) २८४०३ (२७-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीवर्षी दादरच्या इंदू मिलच्या भूखंडावर स्मारकांच्या बांधकामास सुरुवात करण्यात येणार आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचाच भाग म्हणून दिनांक १४ एप्रिल, २०१५ ते १४ एप्रिल, २०१६ हे वर्ष न्याय वर्ष म्हणून साजरे करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वर्षभरात राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रम व कार्यक्रमांसाठी १२५ कोटींचा निधी देण्यात आला आहे हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, या वर्षभरात कोणकोणते उपक्रम व कार्यक्रम राबविण्यात येणार आहे, माहे नोव्हेंबर, २०१५ अखेर किती व कोणकोणते उपक्रम वा कार्यक्रम राबविण्यात आले व त्यासाठी किती खर्च करण्यात आला,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०७-०२-२०१९) :** (१) होय,

शासनाच्या नगर विकास विभागामार्फत याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(२), (३) व (४) होय,

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्ताने कार्यक्रम भाग-१ मध्ये ८ प्रकारचे कार्यक्रम अंतर्भूत करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमांसाठी एकूण रू.१००.०० कोटी तरतूद करण्यात आली आहे. त्यात (१) इंदूमिल येथील स्मारकाच्या बांधकामाचा शुभारंभ (२) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे परदेशात उच्चशिक्षण घेत असतांना त्याचे १९२१-२२ या कालावधीत वास्तव्य असलेले लंडन येथील घराचे "ऐतिहासिक स्मारक" म्हणून विकासाची व वापराची कार्यवाही करणे (३) मागासवर्गीय नोकरी करणाऱ्या महिलांसाठी मुंबई, पुणे व नागपूर येथे वसतिगृहाची सोय करणे (४) राज्यात किमान ५० तालुका स्तरावर ५० मुलींसाठी वसतिगृह बांधणे, दलित वस्तीत विकासाच्या योजना कार्यान्वित करणे (५) घटनास्थळे व महत्वाची ऐतिहासिक स्थळांना पर्यटनाचा दर्जा देणे (६) डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांना शहरालगत नवीन इमारत/संकुल निर्माण करणे इत्यादी कार्यक्रम तसेच भाग-२ मध्ये सन २०१५-१६ ला २५.०० कोटी तरतूद करण्यात आली आहे. यात सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय इत्यादी क्षेत्रात परिसंवाद, चर्चासत्र, कार्यशाळा, प्रदर्शन इत्यादी आयोजन करणे, सर्व जाती-धर्मातील व्यक्तींना समता, सामाजिक न्याय विषयाशी निगडीत बाबींवर संशोधन व M.phil/p.hd करण्यासाठी बार्टीमार्फत "फेलोशिप" देणे. विविध टी.व्ही.चॅनलव्दारे सोशल व प्रिंट मिडिया व इत्यादी च्या माध्यमातून व्यापक कार्यक्रम राबविणे. तालुका स्तरावर समता, सामाजिक न्याय, बंधुत्व, स्वातंत्र्य, वैज्ञानिक जाणीव-जागृती, जातीय दुर्भावनेचे व अंधश्रध्देचे निर्मुलन, व्यसनमुक्ती, राष्ट्रीय एकात्मता, सांप्रदायिक सहिष्णुता या विषयावर व्याख्याने आयोजित करणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन व भाषणे तसेच महात्मा ज्योतिबा फुले, अण्णाभाऊ साठे इ. वाड्मय, साहित्य यांचे प्रकाशन करणे इत्यादी कार्यक्रम राबविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पोलीस कर्मचारी सहकारी पतसंस्थांच्या निव्वळ नफ्याच्या २०% रक्कम पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करण्यात येत नसल्याबाबत

**(८) ३६६१४ (२७-०१-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस कर्मचारी सहकारी पतसंस्थांच्या निव्वळ नफ्याच्या २०% रक्कम पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर २०१५ मध्ये वा त्यासुमारास पोलीस महासंचालक यांनी सर्व पोलीस कर्मचारी सहकारी पतसंस्थांना केलेल्या सूचनेवरून निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्षानुवर्ष पोलीस कर्मचारी सहकारी पतसंस्था सुरळीत व व्यवस्थित काम करत असूनही त्यांचेवर निव्वळ नफ्याच्या २०% रक्कम पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करण्यासाठी दबाव आणण्याची कारणे काय आहेत,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१९) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

मध्यवर्ती पोलिस कल्याण निधी समितीच्या दिनांक १०.३.२०१६ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार पोलिस कल्याण निधी नियमावलीतील नियम क्र. ८ (२) (क) मधील तरतुदीनुसार घटक पोलिस कर्मचारी सहकारी पतसंस्थांनी निव्वळ नफ्याच्या २०% रक्कम पोलिस कल्याण निधीमध्ये जमा करणेबाबतचे निर्देश विशेष पोलिस महानिरिक्षक (प्रशासन) यांनी दिनांक ७.४.२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये दिले आहेत. त्यानुसार ५ संस्थांनी निधी जमा करण्यास संमती दिली असून २९ संस्थांनी नकार दिला आहे व एका संस्थेस पोलिस कल्याण निधीमध्ये रक्कम जमा करण्यास न्यायालयाने स्थगिती दिली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तापी खोऱ्यातील जलसिंचन योजनाप्रमाणे राज्यातील इतर जलसिंचन योजनांना कर्जमाफी देण्याबाबत**

**(९) ३८५७४ (२३-०९-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तापी खोऱ्यातील शेतकऱ्यांनी स्थापन केलेल्या जलसिंचन योजनांना शासनामार्फत कर्ज माफी देण्यात येते तथापि राज्यातील इतर उपसा जलसिंचन योजनांना कर्जमाफी न दिल्याने भू-विकास बँकाकडून कर्ज वसूली करण्यात येत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार तापी खोऱ्यातील जलसिंचन योजनाप्रमाणे राज्यातील इतर जलसिंचन योजनांना कर्जमाफी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) तत्कालीन मा. राज्यमंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली दि. २३/१०/२०१३ रोजी विदर्भातील सहकारी उपसा जलसिंचन संस्थाच्या कर्जमाफीबाबत झालेल्या बैठकीमध्ये राज्यातील विदर्भासाठी उर्वरीत भागातील सहकारी उपसा जलसिंचन संस्थांना शासनामार्फत कर्जमाफी देता येणार नाही असे स्पष्ट केले आहे.
४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (जि.रायगड) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती निवडीबाबत**

**(१०) ४०८६१ (०१-०६-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राजेंद्र पाटील यांना प्राथमिक न्यायालय ते मा.सर्वोच्च न्यायालयाने अपात्र ठरवून सभापती पदापासून दूर होण्याचे आदेश दिलेले असताना सुद्धा श्री.छगन गंडाळ जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था रायगड-अलिबाग यांनी सदर आदेशांचे पालन न केल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा अवमान झाल्याप्रकरणी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था रायगड-अलिबाग यांच्या संशयास्पद कारभाराची चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास मा.सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, जिल्हा उपनिबंधकांना नवीन सभापती पदाची निवड करण्यासाठी बाजार समितीच्या सदस्यांची सभा बोलविण्याचे अधिकार असताना सुद्धा श्री.छगन गंडाळ यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सदस्यांची सभा बोलविली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून न्यायालयाच्या आदेशाचे अवमान करणाऱ्या श्री.छगन गंडाळ यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०२-२०१९) :** (१) होय.

(२), (३) व (४) श्री.राजेंद्र महादेव पाटील यांनी दाखल केलेल्या अपिलावर दोन महिन्यात निकाल देण्याचे आदेश मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांना दिले. तथापि, सदर कालावधी उलटुन गेल्यानंतरही मा.उच्च न्यायालयाकडील अपिलावर निकाल न लागल्यामुळे २ महिन्यानंतर जिल्हा उपनिबंधकांनी या बाजार समितीवर नियमाप्रमाणे सभापती पदाची निवडीची प्रक्रिया पुर्ण करून नवीन सभापतीची निवड केली. त्यामुळे सदर प्रकरणी जिल्हा उपनिबंधकांनी न्यायलयाचा अवमान केलेला नाही.

---

**खामगाव जि.बुलढाणा) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे पैसे निर्बंध असलेल्या बँकेत असल्याबाबत**

**(११) ४१४७२ (०१-०६-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि.बुलढाणा) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे पैसे हे दि. खामगाव जनता कम. को. बँकेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बँकेने आर्थिक गैरव्यवहार केले असल्यामुळे या बँकेवर रिजर्व बँकेने आर्थिक निर्बंध लावले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बँकेतील व्यवहार काही प्रमाणात सुरु केले असल्यामुळे बाजार समितीच्या ठेवी या बँकेतून तत्काळ काढून घेवून राष्ट्रीयकृत बँकेत टाकणे आवश्यक आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित विभागाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०२-२०१९) :** (१) होय
(२) या बॅकेच्या एन.पी.ए. मध्ये झालेली वाढ, संचति तोटयात वाढ तसेच ठेवीचे अपक्षरण या कारणामुळे रिझर्व बॅकेने या बॅकेवर निर्बध लादले होते. सदर निर्बध दि.२६.८.२०१५ पासून शिथिल करण्यात आले असून बॅकेच व्यवहार पुर्ववत सुरू आहेत.
(३) या बॅकेमध्ये बाजार समितीने ठेवलेल्या ठेवींची मुदत संपुष्टात आल्यानंतर बॅकेन यापुर्वी व्याजासह परत केलेल्या आहेत. तसेच काही ठेवींची मुदत संपुष्टात आल्यानंतर बाजार समितीस परत करण्यात येणार असल्याचे बॅकेने बाजार समितीस कळविले आहे.
(४) व (५) ठेवीची मुदत संपुष्टात आल्यानंतरही जर बॅकेने पैसे परत केले नाही तर त्याबाबत संबंधीत संचालक, सचिव यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल असे आदेश दि.७.१.२०१६ रोजी बाजार समितीस देण्यात आले आहेत

---

## राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या आवारामध्ये विक्री होणाऱ्या कृषी मालाची अडत खरेदीदारांकडून घेण्याबाबत

**(१२) ४१८९२ (०१-०६-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या आवारामध्ये विक्री होणाऱ्या शेतीमालावरील अडत शेतकऱ्यांऐवजी खरेदीदारांकडूनच वसूल करावी, तसेच फळे व भाजीपाला नियमनमुक्त करावा, असे शासनाने गठीत केलेल्या २२ सदस्याची कमिटीने त्यांच्या अहवालात स्पष्ट केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या समितीने अडत खरेदीदारांकडून घ्यावी अशी शिफारस असलेला अहवाल शासनाकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान दिला आहे काय, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालावर किती कालावधीत निर्णय घेण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०५-०२-२०१९) :** (१) व (२) होय.
(३) व (४) या अहवालावरील शासन स्तरावर कार्यवाही अंतिम टप्प्यात असून लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

---

### नाशिक येथे परवाना नसलेल्या व्यापाऱ्याकडून द्राक्षांची खरेदी होत असल्याबाबत

**(१३) ४३६९२ (०१-०६-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे तामीळनाडू, कर्नाटक, बिहार, उत्तरप्रदेश, दिल्ली येथील व्यापाऱ्यांकडे बाजार समितीचा परवाना नसताना द्राक्ष खरेदी होत असल्याने शेतकऱ्यांची फसवणूक होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शेतकऱ्यांची फसवणूक होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख (०१-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या फसवणूकीच्या बातम्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या आहेत. तथापि, शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याची तक्रार बाजार समितीकडे किंवा जिल्हा उपनिबंधकांकडे प्राप्त झालेली नाही. त्यामुळे चौकशी करण्यात आलेली नाही. परंतू खबरदारीचा उपाय म्हणून शेतकऱ्यांनी द्राक्ष विक्री करतांना संबंधीत व्यापाऱ्यांची शहानिशा करूनच त्यांच्याशी व्यवहार करण्याबाबत दि.२०.१.२०१६ च्या दै.लोकमत या वर्तमानपत्रातून आवाहन करण्यात आले आहे.

---

### मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या रिक्त पदांबाबत

**(१४) ४४४२६ (०१-०६-२०१६). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने दोन वर्षापूर्वी रिक्त असलेल्या १०६ पदांना मंजुरी देऊन सदर प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाकडे पाठवूनही दोन वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पदांची भरती केल्यास ५० टक्के वेतन खर्चाला शासनाची मान्यता लागते व ही मान्यता मिळेपर्यंत पदांची भरती करता येत नसल्याने बाजार समितीत सध्या कार्यरत असलेल्या ८०० कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या मार्फत सध्याचा कारभार करणे शक्य नसल्याने रिक्त झालेल्या १०६ पदांना त्वरीत मंजुरी मिळावी अशी विनंती एपीएसी संचालक मंडळाने शासनाकडे करुनही सदर प्रस्तावास मंजूरी देण्यास हेतूत: विलंब करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) सदर प्रस्तवाला कधी मंजुरी देण्यात येईल? नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०२-२०१९) :** (१) मुबई कृषि उत्पन्न बाजार समितीमधील रिक्त पदांना मंजूरी देण्याचा प्रस्ताव मागील दोन वर्षात शासनास प्राप्त झालेला नाही.

(२) व (३) समितीच्या निव्वळ उत्पन्नाच्या ५०% पेक्षा जास्त आस्थापना खर्च करता येत नाही. तथापि, पद भरतीचा प्रस्तावच शासनास प्राप्त झालेला नसल्याने त्यांच्या मान्यतेचा व तीन "न" दिल्यामुळे अधिकाऱ्याविरुद्ध कार्यवाहीचा प्रश्न उदभवत नाही.

---

**पाचोरा बाजार समिती (जि.जळगाव) च्या कार्यक्षेत्रतात असलेल्या खाजगी बाजार समित्यांचे व थेट परवाना धारकांचे परवाने रद्द करण्याबाबत**

**(१५) ४५९६९ (०१-०६-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील पाचोरा बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात दोन खाजगी बाजार समित्यांना शासनाने परवानगी दिली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोन्ही बाजार समितीच्या आवारात माल येत नाही वा शेतीमालाचा लिलाव होत नसून फक्त पाचोरा बाजार समितीशी संलग्न असलेल्या खरेदीदारांना त्यांनी खाजगी बाजार समितीचे लायसन्स देऊन १०० रुपयांच्या खरेदीवर २५ पैसे मार्केट फी व सुपरव्हिजन फी म्हणून ५ पैसे प्रमाणे घेऊन कृषि उत्पन्न बाजार समितीस आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच खाजगी बाजार समितीने खरेदी केलेल्या मालाची चौकशी करण्याचे अधिकार कोणाला आहेत याबाबत संभ्रम असल्यामुळे त्याचा परिणाम बाजार समितीच्या आवक वर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे बाजार समित्यांचे होणारे नुकसान टाळण्याकरीता या खाजगी बाजार समितीचे व थेट परवाना धारकांचे परवाने रद्द करण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधींनी शासनाकडे वारंवार विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या खाजगी बाजार सामित्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यांचे स्वरूप काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०२-२०१९) :** (१) होय

(२) नाही, या दोन्ही खाजगी बाजारांमध्ये शेतमालाची नियमित आवक सुरू असून लिलावाद्वारे शेतमालाची खरेदी-विक्रीचे व्यवहार पार पडतात.

(३) नाही, महाराष्ट्र कृषी पणन (विकास व विनियमन), अधिनियम,१९६३ व त्याखालील नियम १९६७ मधील तरतुदीप्रमाणे खाजगी बाजार, कृषी उत्पन्न बाजार समित्या तसेच व्यापारी, शेतकरी व ग्राहक यांच्यामध्ये कोणताही विवाद झाल्यास त्या विरूध्द पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे दाद मागता येते.

(४) व (५) पणन अधिनियमातील तरतुदीप्रमाणे खाजगी बाजारास तसेच थेट पणनचे परवाने देण्यात येतात. अशापरवानाधारकांविरूध्द तक्रार प्राप्त झाल्यास त्याची शहानिशा करून

अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक कार्यवाही करण्यात येते. प्रस्तुत प्रकरणी अशा तक्रारी प्राप्त न झाल्यामुळे त्यांच्या विरूध्द कारवाई करण्यात आली नाही.

---

**पारोळा तालुक्यातील (जि. जळगाव) कृषी उत्पन्न बाजार समितीकडून बांधण्यात आलेल्या व्यापारी गाळ्यांच्या कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आल्याबाबत**

**(१६) ४६०४८ (०१-०६-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा तालुक्यातील (जि. जळगाव) कृषी उत्पन्न बाजार समितीकडून बांधण्यात आलेल्या व्यापारी गाळ्यांच्या कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले आहे, याबाबत संचालकांनी माहिती (तक्रार करून) देवूनही बैठकीत सभापतींनी ठेकेदांराचे देयक मंजूर केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत सदर कामात खडी, रेती, दगड व सिंमेट हे निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असून ते अंदाजपत्रकाप्रमाणे नसल्याचे निदर्शनला आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०२-२०१९) :** (१) दि.२७.०१.२०१६ रोजी झालेल्या बाजार समितीच्या बैठकीमध्ये सदर देयक अदा करण्यासाठी बहूमताने मंजूरी दिलेली आहे.

(२), (३) व (४) प्रस्तुत तक्रार ही बांधकामाच्या दर्जाबाबतची आहे. त्यामुळे बाजार समितीमार्फत करण्यात आलेल्या कामाची तपासणी शासनाच्या गुणनियंत्रण प्रयोगशाळेमार्फत अथवा सक्षम प्राधिकरणामार्फत करुन अहवाल जिल्हा उपनिबंधकांना सादर करावा व त्यानंतरच देयकाची रक्कम अदा करावी अशा सूचना जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव त्यांच्या दि.५.४.२०१६ च्या पत्रान्वये बाजार समितीस दिलेल्या आहेत.

---

**पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या किराणा भुसार मालाच्या बाजारात विना परवाना दुकाने सुरू असल्याबाबत**

**(१७) ४६४४४ (०१-०६-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या किराणा भुसार मालाच्या बाजारात विना परवाना दुकाने सुरू असल्याचे माहे जाने २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकार निदर्शनास आल्यानंतर प्रशासकीय मंडळाच्या आदेशानुसार प्रशासनाने २७ जणांना नोटीस बजावल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विना परवाना किंवा परवान्याचे नूतनीकरण न करता दुकाने चालू ठेवणाऱ्यांची संख्या त्याहून अधिक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (०५-०२-२०१९) :** (१) व (२) होय.

(३) नाही.

(४), (५) व (६) बाजार समितीच्या आवारात व्यवसाय करण्यासाठी अनुज्ञप्ती घेणे पणन अधिनियमातील तरतूदीप्रमाणे बंधककारक आहे. पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये अनुज्ञप्ती न घेता व्यवसाय करणाऱ्या २७ व्यापाऱ्यांना बाजार समितीने नोटीस दिल्या आहेत. त्यानंतर या व्यापाऱ्यांपैकी ३ व्यापाऱ्यांना अनुज्ञप्ती देण्यात आली असून ६ व्यापाऱ्यांची अनुज्ञप्तीसाठी बाजार समितीकडे अर्ज केलेले आहे. तसेच उर्वरित व्यापाऱ्यांपैकी काही न्यायालयीन वाद सुरू असणे, बाजार समितीचे रकमा येणे बाकी असणे, भूखंड धारकाने जबाबदारी निभावण्याचे हमीपत्र न देणे इ. कारणाने अनुज्ञप्ती देण्यात आलेली नाही. या बाबींची पुर्तता केल्यानंतर बाजार समितीमार्फत अनुज्ञप्ती देण्यात येईल.

---

## कळवा (जि.ठाणे) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन इमारतीच्या बांधकामाबाबत

**(१८) ४८००८ (०१-०६-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा (जि.ठाणे) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या इमारतीचे ४ वर्षात केवळ फाऊंडेशन काम सुरु असल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर इमारतीच्या बांधकामासाठी रु.८ कोटी खर्चाची तरतूद करण्यास आली असून सदर इमारत माहे २०१३ पर्यंत उभी राहणे आवश्यक होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी इमारत बांधण्यास विलंब झाल्यामुळे त्याचा खर्च वाढणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर इमारत पूर्ण करण्याची जबाबदारी कोणाची आहे,

(५) असल्यास, सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन कार्यालये सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. राजकुमार बडोले (०७-०२-२०१९) : (**१), (२), (३), (४) व (५)

डॉ. बाबासाहेब आंबेडर सामाजिक न्याय भवन बांधण्याकरीता कळवा जि. ठाणे येथे सामाजिक न्याय भवन बांधकामाकरीता शासन ज्ञापन दि. ५/१२/२०१३ अन्वये रू.८.०० कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला असून रू.११.८६ कोटी इतक्या रकमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देणे प्रस्तावित आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडर सामाजिक न्याय भवनाच्या बांधकामाचे काम पूर्ण झाले असून सामाजिक न्याय भवन इमारत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास हस्तांतरीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.

---

**देऊळगाव (जि.बुलढाणा) येथील स्थानिक बाजार समितीच्या सचिवानी बाजार यार्डात अनधिकृतपणे केलेल्या भूसार बाजार बांधकामाची चौकशी करण्याबाबत**

**(१९) ४९१६९ (०१-०६-२०१९). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगाव (जि.बुलढाणा) येथील स्थानिक बाजार समितीच्या सचिवांनी नियमांना डावलून बाजार यार्डात अनधिकृतपणे केलेल्या भूसार बाजार बांधकामाची चौकशी करण्याचे आदेश कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक यांनी जिल्हा उपनिबंधकांना माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान आदेश दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी अनधिकृतपणे केलेल्या भूसार बाजार बांधकामाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, सदर चौकशीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे, काय,

(३) असल्यास, अहवालातील शिफारशीनुसार दोषी व्यक्तींविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) देऊळगाव राजा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भुसार बाजाराच्या बांधकामास परवागनी देण्याचा प्रस्ताव बाजार समितीने नगर परिषदेकडे दि.३.२.२०११ मध्ये सादर केला. या प्रस्तावात त्रुटी असल्याची बाब नगर परिषदेने दि.२०.९.२०१२ रोजी बाजार समितीस कळविली. महाराष्ट्र म्युनिसिपल कॉउन्सिल नगर पंचायत ॲड इंडस्ट्रियल टाऊनशिप टॅक्ट, १९६५ मधील कमल १८९ प्रमाणे ६० दिवसाच्या आत नगर परिषदेने आक्षेप / त्रुटी संबंधितांना न कळविल्यास किंवा परवानगी न दिल्यास आपोआप परवागनी प्राप्त झाल्याचे समजले जाते. त्याप्रमाणे विहित मुदतीत परवानगी न मिळाल्यामुळे बाजार समितीने बांधकामाची प्रक्रिया सुरू केलेली आहे.

तथापि यासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या चौकशीमध्ये बांधकामातील तांत्रिक बाबींसाठी पणन मंडळाने नियुक्ती केलेले आर्किटेक्टने जबाबदारीने काम पार पाडले नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्यांचे विरूध्द कारवाई करण्याचे निर्देश जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा यांना देण्यात आले आहेत.

---

**कृषी उत्पन्न बाजार समितीने राज्यात किराणा भुसार मालाच्या खरेदीदारांना किरकोळ विक्रेते समितीकडून परवाना घेणे बंधनकारक केल्याबाबत**

**(२०) ४९५०६ (०१-०६-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी उत्पन्न बाजार समितीने राज्यात किराणा भुसार मालाच्या खरेदीदारांना किरकोळ विक्रेते समितीकडून परवाना घेणे बंधनकारक केले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुसंख्य विक्रेते या निर्णयाच्या विरोधात असल्याने परवाना घेत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०२-२०१९) :** (१) पणन अधिनियमातील कलम ७ प्रमाणे बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात शेतमालाचा खरेदी विक्री व्यवहाराशी संबंधीत सर्व घटकांनी बाजार समितीकडून परवाना घेणे बंधनकारक आहे.

(२), (३), (४) व (५) विना परवाना व्यवसाय करण्यात येत असल्याची प्रकरणे निदर्शनास आली आहेत. अशा विना परवाना व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांविरूध्द पणन अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना दि.१.६.२०१६ च्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत.

---

**राज्यातील जिल्हा बँकांना सक्षम करण्यासाठी शासनाच्या विविध विकास कामांचा निधी जिल्हा बँकेत ठेव म्हणून ठेवण्याबाबत**

**(२१) ५१०५८ (०१-०६-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा बँकांना सक्षम करण्यासाठी शासनाच्या विविध विकास कामांचा निधी जिल्हा बँकेत ठेव म्हणून ठेवावा अशी दि धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.धुळे यांनी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मा. सहकार मंत्री यांचेकडे अर्जाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१९) :** (१) होय.

(२) राज्यामध्ये ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आहेत. सदर बँकांचे कर्जापैकी ढोबळ NPA प्रमाण ३६.९५ % आहे. त्यापैकी ५ बँका तोट्यात असून तीन बँकांचा CRAR ९ % पेक्षा कमी आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी कोअर बँकींग प्रणालीचा व अत्याधुनिक बँकींग प्रणालीचा अवलंब केला आहे. बँकांच्या आर्थिक स्थितीत गुणात्मक वाढ झाल्यास शासन या मागणीचा गांभिर्यपूर्ण विचार करेल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्ह्यातील गटविमा योजनेअंतर्गत शासकीय/जिल्हापरिषद कर्मचाऱ्यांना सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या घरांचा ताबा देण्याबाबत**

**(२२) ५२७०१ (१८-०८-२०१६). :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील गटविमा योजनेअंतर्गत शासकीय/जिल्हापरिषद कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या ७८४ सभासदांकडून १९ कोटी ५० लाख रुपये जमा करुन गेली १० वर्षापासून घरांचा ताबा दिलेला नसल्याप्रकरणी चौकशी करणेबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांना दिनांक १० जुलै, २०१५ रोजीच्या पत्रानुसार उपसचिव, सहकार विभाग, महाराष्ट्र शासन यांनी आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार या प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (१५-१२-२०१८) : (**१) होय,

(२) व (३) जालना जिल्हात गटविमा योजनेतंर्गत राज्य शासनाकडून एकूण २८ संस्थाना घरबांधणी कर्ज मंजूर झालेले आहे, २८ संस्थापैकी ५ संस्थाचे घराचे १००% बांधकाम पूर्ण झालेले आहे. व त्यांनी सभासदांना घराचा ताबा दिलेला आहे. उर्वरीत २३ संस्थाचे घराचे बांधकाम अपूर्ण आहे.

२८ संस्थापैकी १० संस्थाविरुध्द सभासदाच्या तक्रारी प्राप्त आहेत, १३ संस्थाविरुध्द लेखापरिक्षणाकरीता अभिलेखे उपलब्ध न केल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८० अन्वये कार्यवाही प्रस्तावित केली आहे. तसेच २६ संस्थावर कलम १०२ अन्वये कार्यवाही करण्यात आलेली आहे, २ संस्थाविरुध्द दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला आहे.

दिनांक ३१/०३/२०१८ अखेर २८ संस्थेचे लेखापरिक्षण पुर्ण करण्यासाठी लेखापरिक्षकाची नियुक्ती केलेली असून २ संस्थाचे लेखापरिक्षण पुर्ण झालेले आहे, ७ संस्थाचे दप्तर

लेखापरिक्षणाकरीता उपलब्ध असून उर्वरीत संस्थाचे रेकॉर्ड प्राप्त करून घेण्याची कार्यवाही करण्यात येत असून प्रत्यक्ष स्थळपाहणी व चौकशीअंती लेखापरिक्षण पुर्ण झाल्यानंतर पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**धुळे येथील सामाजिक न्यायभवनाचे काम पुर्ण करण्याबाबत**

**(२३) ५५६९८ (२६-०९-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील सामाजिक न्यायभवनाचे काम अपूर्ण निधीमुळे रखडले असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सामाजिक न्याय भवनाचे काम लवकर पूर्ण होण्यासाठी निधी तात्काळ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०७-०२-२०१९) : (**१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) विभागाच्या दि. ३१/३/२०१६ च्या शासन ज्ञापनान्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, धुळे या इमारतीच्या बांधकामाच्या सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधी वर्ग करण्याते आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात दुष्काळाच्या छायेत सापडलेल्या मराठवाडा विभागातील आठ जिल्ह्यांसह अहमदनगर आणि सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांना सॉफ्ट लोन सुलभ कर्ज देण्याबाबत**

**(२४) ५६६०५ (०२-११-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुष्काळाच्या गडद छायेत सापडलेल्या मराठवाडा विभागातील आठ जिल्ह्यासह अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यातल्या साखर कारखांन्याना सुलभ कर्ज (सॉफ्ट लोन) देण्याबाबत राज्य शासनाची सकारात्मक असून या उद्योगाला अडचणीतून बाहेर काढण्यासाठी केंद्र शासनाची मदत घेतली जाईल असे मा. मुख्यमंत्री यांनी जाहिर केले असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने जाहिर केल्याप्रमाणे सदर कारखान्यांना सुलभ कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याबाबत शासनाचा अंतिम निर्णय झाला आहे काय,
(४) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.सुभाष देशमुख (३०-०१-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

हंगाम २०१४-१५ ची एफआरपी देणेकरीता केंद्र शासन अधिसूचना दि.२३.०६.२०१५ चे धर्तीवर राज्य शासनाने शासन निर्णय दि.३०.०७.२०१५, ०५.०९.२०१५, ०९.१२.२०१५ व दि.२१.०४.२०१६ अन्वये सॉफ्ट लोन योजना जाहीर केलेली आहे.

राज्यातील काही साखर कारखान्यांनी कर्जाची फेररचना करणेबाबत विनंती केल्यानुसार मा.मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावरुन दि.३१.०३.२०१६ चे व दि.१०.१०.२०१६ च्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आलेली आहे. ऊस खरेदी कराबाबत शासन राजपत्र दि.२६.०४.२०१६ नुसार हंगाम २०१५-१६ मधील ऊस खरेदीकर माफ केलेला आहे.
(२) (३) व (४) शासन निर्णय दि.३०.०७.२०१५, ०५.०९.२०१५, ०९.१२.२०१५ व दि.२१.०४.२०१६ अन्वये राज्यातील साखर कारखान्यांना हंगाम २०१४-१५ मधील एफआरपी देण्याकरीता वित्तीय संस्थाकडून सॉफ्ट लोन मंजूर झालेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्रीपूर (ता.माळशिरस,जि.सोलापूर) येथील पांडुरंग साखर कारखान्याच्या अस्वच्छतेमुळे डेंग्यूची साथ पसरल्याबाबत

**(२५) ६५१९८ (२७-०१-२०१७). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीपूर (ता.माळशिरस,जि.सोलापूर) येथील पांडुरंग साखर कारखाना तसेच महाळुंग येथील ब्रिमासागर डिस्टिलरीच्या दोन्ही कारखान्याच्या दुर्लक्षामुळे सदर परिसरात सांडपाणी व कचऱ्यामुळे अस्वच्छता पसरली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी महाळुंग व श्रीपूर ग्रामपंचायतीने उक्त साखर कारखान्यांना पत्र/नोटीस देऊनही कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कारखान्याच्या अस्वच्छतेमुळे डेंग्यूची साथ मोठया प्रमाणात पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख (०२-११-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) ग्रामपंचायत महाळूंग व ग्रामपंचायत श्रीपूर यांनी सदरील कारखान्यांना पत्र / नोटीस दिलेली नाही.

(३) हे खरे नाही.

या परिसरात डेंग्यूची साथ पसरली नाही.

(४) श्रीपूर (ता माळशिरस जि. सोलापूर) येथे पांडूरंग सहकारी साखर कारखाना तसेच महाळूंग येथील ब्रिमासागर डिस्टिलरीच्या दोन्ही कारखान्याच्या परीसरात सांडपाणी व कचऱ्यामुळे अस्वच्छता पसरली होती. त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दिनांक ७.५.२०१८ रोजी मे. श्री. पांडूरंग सहकारी साखर कारखाना यांना नोटीस बजावली आहे. तसेच मे. बिमा सागर महाराष्ट्र डिस्टीलरीज लि. यांना दिनांक २.७.२०१८ रोजी उत्पादन बंदीचे आदेश बजावण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात व्यापारी शेतकऱ्यांकडून अडत वसूल करत असल्याबाबत**

**(२६) ६६९५६ (२७-०१-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या व विक्रीस आणलेल्या शेतीमालावर अडत न घेण्याचा कायदा १९६३ मध्ये समंत होऊनही अदयापी व्यापारी शेतकऱ्यांकडून अडत वसूल करून शेतकऱ्यांची लूट करत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार जबाबदार असणाऱ्या व्यापाऱ्यांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.सुभाष देशमुख (०२-०२-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ मधील तरतुदीनुसार खरेदीदारांकडून आडत वसूल करण्याची तरतुद आहे. मात्र त्याची अंमलबजावणी सर्वच ठिकाणी करण्यात येत नव्हती. त्यामुळे खरेदीदाराकडून अडत वसूल करण्याची स्पष्ट तरतूद अधिनियमात करण्यात आलेली आहे. त्यामुळे सर्व बाजार समित्यामध्ये आता शेतकऱ्याकडून अडत वसूल न करता खरेदीदार, किरकोळ व्यापाऱ्याकडून अडत वसुली करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये 'उचल' या नावाखाली देयकातून कपात करण्यात येत असल्याबाबत**

**(२७) ७००३८ (२७-०१-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीतील व्यापारी शेतकऱ्यांच्या मालाच्या लिलावानंतर शेतकऱ्यांने कोणतीही उचल घेतलेली नसताना, तीन टक्के उचल कपात करुन देयक तयार करत असल्याची तक्रार एका शेतकऱ्याने सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे यांचेकडे केली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार वेगवेगळ्या मार्गाने शेतकऱ्यांची अडवणूक करुन लूट करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१८-०१-२०१९) :** (१)हे खरे नाही.

माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान अशा प्रकारचा कोणताही तक्रार अर्ज पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे कडे प्राप्त झालेली नाही.

(२) प्रश्न उदभवत नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांना दिलेल्या कर्जाच्या शासन थकहमीची रक्कम नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला मिळणेबाबत**

**(२८) ७०५६५ (२७-०१-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांना दिलेल्या कर्जाच्या शासन थकहमीची रक्कम नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी सातत्याने शासनाकडे मागणी करूनही अद्यापी कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकेची आर्थिक परिस्थिती व सदर संस्थाकडील एन पी ए विचारात घेता बँकांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्याकरिता शासनाने थकहमीची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.सुभाष देशमुख (२८-०१-२०१९) :** (१) व (२) स्थानिक लोकप्रतिनिधीनी याबाबत शासनाकडे मागणी केली आहे.

सदर प्रकरणी बँकेचे प्रतिनिधी, कारखाना प्रतिनिधी व सर्व संबंधितांची साखर आयुक्त कार्यालयामध्ये दि.२६.०६.२०१८ व दि.०२.०७.२०१८ बैठक झाली. सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने कर्ज दिलेल्या नांदेड जिल्ह्यातील ३ साखर कारखाने व १ खांडसरी उत्पादक संस्था यांच्यापैकी २ कारखाने अवसायनात असल्याने त्यांच्या मालमत्तेच्या विक्रीतून कर्जाची रक्कम वसूल होवू शकेल. तसेच खांडसरी उत्पादकाच्या जमीन विक्रीतून सदर कर्जाची वसुली होवू शकेल. अन्य १ कारखान्यांची विक्री झाली असल्याने कर्जाची रक्कम वसूल करण्याची जबाबदारी संबंधित बँकेची आहे.

---

### यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत जमा झालेल्या जुन्या नोटांच्या चौकशीबाबत

**(२९) ७५८२५ (१५-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ७६ कोटी रुपयांच्या जुन्या नोटा दिनांक १० ते १२ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास जमा झाल्याने नाबार्डला चौकशी करण्याचे आदेश रिझर्व्ह बँकेने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१९) :** (१) होय.

(२) नाबार्डने केलेल्या चौकशीत यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून रु.१२७.४३ कोटीच्या चलनातून बाद केलेल्या नोटा जमा करण्यात आल्या आहेत असे आढळून आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील ७२ हजार सहकारी संस्थांची नोंदणी रद्द करण्याबाबत

**(३०) ८०३६० (२१-०४-२०१७). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे ७२ हजार सहकारी संस्थांची नोंदणी रद्द करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सर्वसाधारण कारणें काय आहेत,

(३) असल्यास, आतापर्यंत किती सहकार संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-०३-२०१८) :** (१) नाही.

तथापि, सन २०१५-१६ या वर्षातील सहकारी संस्थांच्या सर्वेक्षणाअंती बंद, ठाव ठिकाणा नसलेल्या / कार्यस्थगित आढळून आलेल्या एकूण ५४,१२४ संस्था पैकी दि.३१.०३.२०१७ अखेर २६,४१२ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे.

(२) सर्वेक्षणाअंती बंद, कार्यस्थगित व ठाव ठिकाणा नसलेल्या सहकारी संस्था आढळून आल्यामुळे त्या अवसायनात घेण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) दि. ३१.०३.२०१७ अखेर २६,४१२ सहकारी संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे.

---

**मौजे सिध्देश्वर कॅम्प (ता. औंढा,जि.हिंगोली) येथे अपूर्णावस्थेत असलेली घरे बांधण्यासाठी निधी देण्याबाबत**

**(३१) ८३८८४ (२०-०४-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सिध्देश्वर कॅम्प (ता.औंढा, जि.हिंगोली) येथे घरकुल योजनेतंर्गत लाभार्थ्यांना घरे मिळणार होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेतंर्गत लाभार्थ्यांनी घराचे काम सुरु केल्यानंतर शासनाकडून अपूरा निधी मिळाल्याने घराची कामे अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी अपूर्णावस्थेत असलेली घरे पूर्णपणे बांधण्यासाठी लाभार्थ्यांना संपूर्ण निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०७-०२-२०१९) :** (१) नाही

(२) नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पातुर्डा (जि.बुलडाणा) येथील संग्रामपूर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या नाफेड केंद्रावरील अधिकाऱ्यांनी अयोग्य धोरण अवलंबिले असल्याबाबत**

**(३२) ८६९९७ (१८-०८-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पातुर्डा (जि.बुलडाणा) येथील संग्रामपूर कृषि उत्पन्न बाजार समिती अंतर्गत नाफेड खरेदी केंद्रावर दिनांक १६ जानेवारी, २०१७ पासून तूर खरेदी सुरू असून तूर खरेदीबाबत शासनाच्या अयोग्य धोरणामुळे शेतकऱ्यांना त्रास होत असल्याचे दिनांक २२ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुरीचे मोजमाप करण्यास होणारा विलंब, बारदान्याचा अभाव, मोजणीसाठी आवश्यक संख्येप्रमाणे मोजकाट्यांचा अभाव, प्रलंबीत चुकारे इत्यांदीबाबत संबंधीत यंत्रणेने अक्षम्य दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, चौकशीअंती दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१८-०१-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर कालावधीमध्ये नाफेडने पातुर्डा जि.बुलढाणा येथे खरेदी केंद्र सुरू केलेले नाही. बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर हे तालुका ठिकाण असून सदर तालुक्यातील पातुर्डा हे एक गाव आहे व येथे कृषी उत्पन्न बाजार समिती, संग्रामपूर या बाजार समितीचे उपबाजार कार्यरत आहे. सदर कालावधीमध्ये पातुर्डा या उपबाजाराचे जागी नाफेडचे खरेदी केंद्र सुरू करण्यात आलेले नसून ते संग्रामपूर या ठिकाणी सुरू करण्यात आले होते.

बुलढाणा जिल्ह्यामध्ये मार्केटींग फेडरेशन मुंबई यांच्यामार्फत संग्रामपूर खरेदी केंद्रावर तूर खरेदी करण्यात आलेली आहे. त्यामुळे पातुर्डा येथे तूर खरेदी करण्यात आलेली नाही. ही बाब पाहता सदर खरेदी केंद्रावर तूरीचे मोजमाप करण्यास होणारा विलंब, बारदानाचा अभाव, मोजणीसाठी आवश्यक संख्येप्रमाणे मोजकाट्यांचा अभाव, प्रलंबित चुकारे इत्यादीबाबत अक्षम्य दुर्लक्ष झालेले नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

---

### राज्यात द्राक्षे उत्पादन खर्चाच्या निम्मेही दर मिळाले नसल्याबाबत

**(३३) ८७०२१ (१५-०८-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे फ्रेबुवारी, मार्च, एप्रिल या ३ महिन्यात हंगामातील ७० टक्के द्राक्षे माल बाजारात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मात्र यावर्षी या कालावधीत देशातंर्गत तसेच निर्यातीच्या द्राक्षांना उत्पादन खर्चाच्या निम्मेही दर मिळाले नसल्याने द्राक्षे उत्पादकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसानग्रस्त द्राक्षे उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०२-२०१९) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यातील आल उत्पादनाला योग्य भाव मिळण्याबाबत**

**(३४) *८८८५०* (१५-०८-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यातील शेतकऱ्यांनी सुमारे २५० ते ३०० हेक्टरवर आल्याची लागवड करण्यात आली होती परंतु आल उत्पादनास योग्य भाव न मिळाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर आलं उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२९-०१-२०१९) :** (१) नाही.
फुलंब्री तालुक्यात अद्रकला योग्य भाव न मिळाल्याने अद्रक उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असल्याबाबत कोणताही तक्रार अर्ज सहायक निबंधक, सहकारी संस्था ता.फुलंब्री यांचेकडे प्राप्त झालेला नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गवळीशिवरा (ता.गंगापूर , जि.औंरगाबाद) येथे टोमॅटोला प्रतिकिलो ५० पैसे भाव मिळाल्याने येथील शेतक-यांनी टोमॅटोच्या शेतात जनावरे सोडून दिल्याबाबत**

**(३५) *८८९८२* (१५-०८-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गवळीशिवरा (ता.गंगापूर, जि.औंरगाबाद) येथे टोमॅटोला प्रतिकिलो ५० पैसे भाव मिळाल्याने येथील शेतकऱ्यांनी टोमॅटोच्या शेतात जनावरे सोडून दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथील टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. सुभाष देशमुख (०२-०२-२०१९) :** (१) नाही.
याबाबत कोणताही तक्रार अर्ज सहायक निबंधक, सहकारी संस्था ता.गंगापूर, कृषी उत्पन्न बाजार समिती,गंगापूर व लासूर स्टेशन ता.गंगापूर यांचे कार्यालयास प्राप्त झालेला नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोयगाव (जि.औरंगाबाद) तालुक्यात रब्बी पिकाच्या हंगामात नोटाबंदीमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान**

**(३६) ८८९८४ (१५-०८-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोयगाव (जि.औरंगाबाद) तालुक्यात रब्बी पिकाच्या हंगामात नोटाबंदीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून पपई प्रति किलो ८ रुपये तर केळी प्रति ६ किलो रुपयांनी बांधावरच विकण्याची वेळ आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने या आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३०-०१-२०१९) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रमाई घरकुल योजनेच्या अनेक लाभार्थीच्या घरावर नावाच्या पाट्या बसविल्या नसल्याबाबत**

**(३७) ९०५१४ (१८-०८-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रमाई घरकुल योजनेच्या लाभार्थीच्या घरावर त्यांच्या नावाची पाटी लावण्यासाठी खरेदी करण्यात आलेल्या १ लाख २० हजार पाट्यांपैकी ५४ हजार १५३ पाट्या अद्याप बसविण्यात आल्या नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करारनाम्यांच्या अटीचा भंग करुन ठेकेदाराला १०० टक्के रक्कम शासनाद्वारे अदा करण्यात आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (०७-०२-२०१९) :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) सदर अनियमिततेस जबाबदार असलेले तत्कालीन आयुक्त, उपायुक्त (नाहस), सहायक आयुक्त (सहकार) यांना कारणे दाखवा नोटीस देऊन, दोषारोप बजावण्यात आलेले आहेत व संबंधित प्रमुख लिपिक यांना निलंबित करण्यात आले आहे.

तसेच सदर अनयिमिततेबाबत संबंधित संस्थेस कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(५) प्रश्न उभ्दवत नाही.

---

**शेतक-यांना पिक विम्याची रक्कम तात्काळ देण्याबाबत तसेच कर्ज खात्यातील पिक विम्याची रक्कम कपात न करण्याबाबत**

**(३८) ९११४५ (१५-०८-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम तात्काळ देण्याबाबत तसेच कर्ज खात्यात पिक विम्याची रक्कम कपात न करण्याबाबत शासन स्तरावर निर्णय झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात लोहा (जि.नांदेड) येथील शेतकऱ्यांनी पिक विम्याची रक्कम तात्काळ द्यावी व कर्ज खात्यात पिक विम्याची रक्कम कपात करु नये या मागणीसाठी शेतक-यांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान देना बॅकेसमोर धरणे आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पीक विम्याची रक्कम मागणाऱ्या शेतकऱ्यांना / आंदोलनकर्त्यांना बॅकेच्या अधिकाऱ्यांनी पोलिसांच्या स्वाधीन केले हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम तसेच कर्ज खात्यात पिक विम्याची रक्कम कपान न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१९) :** (१) पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना तात्काळ देणेबाबत निर्णय झालेला आहे.

(२) होय, माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये शेतकऱ्यांनी आंदोलन केले आहे.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) अशा प्रकारच्या कर्ज प्रकरणांत बँकिंग नियमावली नुसार कार्यवाही केली जाते. भारतीय रिझर्व्ह बँक व SLBC च्या मार्गदर्शक सूचनांनुसारच सदर कार्यवाही झालेली आहे.

रिजर्व बँकेच्या निर्देशानुसार नैसर्गिक आपत्तीने बाधिक कर्ज पुनर्गठनाच्या ज्या प्रकरणांत नव्याने कर्जवाटप झालेले नाही, अशा प्रकरणांत सहानुभूतीपूर्वक विचार करण्याबाबत कळविले असून केवळ अशा प्रकरणांत पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाते.

पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या कर्जखात्याऐवजी बचत खात्यात जमा करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावरून रिजर्व बँकेचे गव्हर्नर यांच्याकडे वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातुर जिल्ह्यातील लातुर इंडस्ट्रियल इस्टेट को.ऑप.सोसायटी संस्थेच्या सभासदांबाबत महाराष्ट्र सहकारी संस्थेचे कलम २५ (अ) नुसार कार्यवाही करण्याचे आदेश दिल्याबाबत**

**(३९) ९२१६८ (०९-०८-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातुर जिल्ह्यातील लातुर इंडस्ट्रियल इस्टेट को.ऑप.सोसायटीला मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्या निदेशानुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था लातुर यांनी त्यांचे आदेश दिनांक २९ नोव्हेंबर, २०११ नुसार सदर संस्थेच्या सभासदांबाबत महाराष्ट्र सहकारी संस्थेचे कलम २५ (अ) नुसार कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशांचे संस्थेने पालन न केल्याबद्दल व अन्य गैरव्यवहाराबाबत संस्थेचे संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २९ नोव्हेंबर, २०११ च्या सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (०२-०२-२०१९) :** (१) होय.

(२), (३) व (४)

सहायक निबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी त्यांच्या दि.२९.११.२०११ रोजीच्या आदेशान्वये संबधित अर्जदाराच्या तक्रार अर्जावर कलम २५ (अ) नुसार संबधित संस्थेने

तक्रारीमधील बाबींवर रीतसर कार्यवाही करून निर्णय घ्यावा असे आदेशित केले होते. मात्र, सदर आदेशाची पुर्तता न झाल्याने संबधित संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले होते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नळदुर्ग (जि.उस्मानाबाद) येथील ग्रामीण रूग्णालय इमारत व कर्मचारी वसाहतीच्या बांधकामाबाबत**

**(४०) ९२८२२ (१८-०८-२०१७). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नळदुर्ग (जि.उस्मानाबाद) तालुक्यात सामाजिक न्याय विभागाच्या वतीने मागासवर्गीय मुलांच्या निवासासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे वसतिगृहाकरीता शासनाने मंजूरी देऊनही अद्याप उक्त इमारतीच्या कामास सुरूवात झाली नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसाहतीच्या इमारतीचे काम पूर्ण करण्याबाबत नागरिकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व मा.आरोग्य मंत्री यांच्याकडे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०७-०२-२०१९) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) असे निवेदन या विभागास प्राप्त नाही.
(३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे वसतिगृहाच्या इमारत बांधकामाचे कार्यारंभ आदेश दि.२२.०७.२०१७ रोजी देण्यात आलेले असून सद्यस्थितीत सदरहू इमारतीचे स्थापत्य काम पूर्ण झालेले असून गिलावा व फरशीचे काम प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आमणी (बु) (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथे रमाई आवास योजनेचा लाभ ओबीसी प्रवर्गाच्या लाभार्थ्यांना दिल्याबाबत**

**(४१) ९३८१६ (१८-०८-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आमणी (बु) (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथील रमाई आवास योजनेचा लाभ ओबीसी प्रवर्गाच्या लाभार्थ्यांना दिल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची तक्रार सीईओकडे करण्यात आली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१०-०२-०२०१)** : (१) होय.

(२) होय.

(३) होय,

चौकशीअंती रमाई आवास योजनेचा लाभ ओबीसी लाभार्थ्यास दिल्याचे आढळून आले आहे.

(४) चौकशीनुसार अपहारित रक्कम वसुल करुन शासन खाती भरणा करण्यात आली आहे व जबाबदार आमणी (बु.) येथील सचिवाविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाहीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उभ्दवत नाही.

---

## राज्यातील सहकारी साखर कारखान्यांनी सहवीज प्रकल्पांसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी अनुदान मिळण्याबाबत

**(४२) ९५७५७ (०६-०१-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहकारी साखर कारखान्यांकडून वीज खरेदी करण्यास ऊर्जा विभागाने नकार दिल्यामुळे सहवीज प्रकल्पांसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी शासनाने अनुदान द्यावे अशी मागणी राज्य सहकारी संघाने व लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री तसेच मा.सहकारमंत्री यांचेकडे दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहकारी साखर कारखाने अडचणींत आल्यामुळे त्यांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१३-०२-२०१९) :** (१), (२) व (३) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, राज्यातील सहकारी साखर कारखान्यांकडून वीज खरेदीबाबत ऊर्जा विभागामार्फत पुढील निर्णय घेण्यात आले आहेत.

१) ऊसाच्या चिपाडावर आधारीत सहवीज प्रकल्प व कृषीजन्य अवशेषावर आधारीत स्त्रोतांकडून स्पर्धात्मक निविदेच्या प्रक्रियेद्वारे वीज खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
२) दि.२३/११/२०१७ रोजी स्पर्धात्मक निविदेद्वारा ३०० मे.वॅ.क्षमतेपर्यंत वीज खरेदी करार करण्याचा निर्णय झाला आहे.
३) दि.१३/७/२०१८ च्या पत्राद्वारे स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेद्वारे वाढीव २०० मे.वॅ.क्षमतेपर्यंत रू.४/- दराने वीज खरेदी करार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील नावंढे नऊ गाव उत्कर्ष समितीने एमआयडीसीकरिता जमीन न देण्याबाबत दिलेले निवेदन**

**(४३) ९७४४४ (०३-०१-२०१८). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील दुसऱ्या टप्प्यातील प्रस्तावित नावंढे एमआयडीसीच्या संपादनासाठी ७८० हेक्टर १२०० एकर शेतजमिनीवर पेन्सिलने शिक्का मारुन अडविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत नावंढे नऊ गाव उत्कर्ष समितीने एमआयडीसीकरिता जमीन न देण्याबाबत तहसिलदार खालापूर यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१४-०१-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) दिनांक १२/०१/२०१८ रोजी मा.सभापती महाराष्ट्र विधानपरिषद यांचेकडे बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस शेतकऱ्यांचे प्रतिनिधी हजर होते. चर्चेदरम्यान महाराष्ट्र औद्योगिक अधिनियम १९६१ मधील कलम ३२ (२) अन्वये संबंधित जमीनधारकांना व्यक्तीगत नोटीस देऊन संबंधिताना हरकती व सूचना देण्याची संधी देऊन त्यांच्या हरकती व सूचना विचारात घेऊन सहमतीने भूसंपादन करण्यात येईल असे ठरल्याने उक्त कलमान्वये संबंधिताना व्यक्तीगत नोटीस देण्यात आलेली आहे. व अधिसूचना दिनांक १५/०२/२०१८ रोजी प्रसिध्द केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी एकूण ३५४७ खातेदारापैकी २९०४ (८२%) खातेदारांना नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. उर्वरित ६४३ (१८%) खातेदार हे गावी अथवा आजुबाजूच्या परिसरात रहात असल्याने आढळून आलेले नाहीत. त्यामुळे १८% खातेदारांना व्यक्तीगत नोटीसा बजावता आलेल्या नाहीत. २९०४ खातेदारापैकी १९९३ (६९%) खातेदारांनी संपादनाबाबत त्यांचे लेखी खुलासे सादर केलेले आहेत व त्यापैकी १२१ (६%)

खातेदारांनी भूसंपादनास सहमती दर्शविलेली असून उर्वरित १८७२ खातेदारांनी भूसंपादनास विरोध दर्शवून असहमती दर्शविलेली आहे. भूधारकाच्या संमतीनेच भूसंपादन करण्याचे धोरण शासनाने मान्य केले असल्याने भूसंपादन भूधारकाच्या संमतीखेरीज करण्यात येणार नाही.

---

**नांदेड जिल्हयात ५४ अनुदानीत वसतिगृहांकडे मंजुरीचे आदेश नसल्याने विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाल्याबाबत**

**(४४) ९९३९२ (१०-०१-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील ५४ अनुदानीत वसतिगृहांकडे मंजुरीचे मुळ आदेश नसल्याचे दिनांक १७ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्हयातील सदरहू ५४ अनुदानीत वसतिगृहांकडे मंजुरीचे मुळ आदेश नसल्याने सदर वसतिगृहात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसान झाले आहे, हे खरे काय आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-०१-२०१९) :** (१) होय.

(२) नाही

(३) राज्यात काही अनुदानित वसतीगृहे शासनाची मान्यता नसतानाही चालविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले असल्याने अशा वसतीगृहाची तपासणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. त्यानुषंगाने अशा वसतीगृहांची तपासणी करण्याकरीता दि.०१.०९.२०१७ च्या आदेशान्वये राज्यमंत्री (सा.न्या) यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती.

नांदेड जिल्ह्यातील मान्यता आदेश नसलेल्या ५४ वसतीगृहांची राज्यमंत्री (सा.न्या.) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सुनावणी घेऊन, सदर ५४ वसतीगृह अनुदानासाठी पात्र ठरल्याने या वसतीगृहांचे अनुदानाचे आदेश आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचे स्तरावर निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी दिल्याचे सांगून लाभार्थी शेतकऱ्यांना कर्जमाफी दाखल्याची प्रमाणपत्रे दिली असल्याबाबत**

**(४५) ९९७७५ (०६-०१-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी दिल्याचे सांगून लाभार्थी शेतकऱ्यांना कर्जमाफी दाखल्याची प्रमाणपत्रे दिली असल्याचे सांगण्यात आले असल्याचे माहे ऑक्टोबर दरम्यान वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे का,

(२) असल्यास, या कर्जमाफीच्या लाभार्थी यांना कर्जमाफीची प्रमाणपत्रे देण्यात आली, परंतु त्यांच्या बँक खात्यात कर्जाची रक्कम जमा झाले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे का,

(३) असल्यास, या कर्जमाफी योजनेतील अशा घटनांना जबाबदार असणाऱ्या संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१९) :** (१) होय,

(२) व (३) विविध बँकांनी कर्जदारांची परिपूर्ण माहिती भरण्यास विलंब झाल्यामुळे काही ठिकाणी बँक कर्ज खात्यात निधी जमा होण्यास विलंब लागला परंतू योजनेच्या निकषानुसार पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्यात येत असल्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्हयातील इ क्लास जमिनीवर भोगवटादार म्हणून राहत असलेल्या नागरिकांना रमाई आवास योजनेचा लाभ देण्याबाबत

**(४६) ९९७९१ (०६-०१-२०१८). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील इ क्लास जमिनीवर अनेक वर्षे भोगवटादार म्हणून राहत असलेल्या नागरिकांना रमाई आवास योजनेचा लाभ देण्यात येत नसल्याची बाब माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यत येतआहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०७-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही,

(२) प्रश्न उदभवत नाही.

याबाबत शासन निर्णय क्र.बीसीएच-२००९/प्र.क्र.१५९/मावक-२, दिनांक ९ मार्च, २०१० अन्वये दिनांक १.१.१९९५ या दिनांकास राज्य शासन/महानगरपालिका/नगरपालिका/स्थानिक स्वराज्य संस्था/एम.एम.आर.डी.ए./शासनाचे उपक्रम यांच्या जमीनीवर अतिक्रमण करुन राहात असलेले व दि.१.१.१९९५ रोजी त्यांचे घरकुल/निवासस्थान उपरोक्त जमीनीवर असल्यास आणि त्यांना संरक्षित झोपडीदार म्हणून संरक्षण प्राप्त असल्यास अशा लाभार्थ्यांना रमाई आवास योजनेचा लाभ देण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतकरी कंपन्यांना ठेकेदारांच्या मदतीने बोगस खतपुरवठा केल्याबाबत**

**(४७) ९९८०६ (०६-०४-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठेकेदारांच्या मदतीने राज्यातील शेतकरी कंपन्यांना बोगस खतपुरवठा केल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी खात्याने या खताचे नमुने काढून प्रयोगशाळेत तपासले असता चाचण्यांमध्ये नमुने अप्रमाणित निघाल्याचे दिसून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकरी कंपन्यांना बोगस खतपुरवठा करणाऱ्या ठेकेदारांवर वा संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख (०२-०२-२०१९) :** (१) व (२) महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पातर्गत आत्मा धुळे कार्यालयाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार धुळे जिल्ह्यात सन २०१७-१८ खरीप हंगामामध्ये स्थापित शेतकरी उत्पादक कंपन्यांनी निविष्ठा खरेदी करुन सदर निविष्ठा शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या सभासदांना वितरीत करण्यात आल्या. कृषि अधिकारी, पंचायत समिती शिंदखेडा यांनी निविष्ठांचे ५ नमुने शासकीय प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविले होते त्यापैकी ३ नमुने अप्रमाणित घोषित झाले होते. संबंधीत कंपनीने अप्रमाणित घोषित झालेल्या नमुन्यासंदर्भात पुर्नविश्लेषणासाठी अपिल दाखल केले होते. या अपिलात ३ नमून्यापैकी २ नमूने पुर्नविश्लेषणात प्रमाणित असल्याचे घोषित करण्यात आले असुन, उर्वरित १ नमुना अप्रमाणित असल्याचे आढळून आला आहे.

(३) पुर्नविश्लेषणात अप्रमाणित असल्याचे आढळून आलेल्या नमुन्यासंदर्भात दि.१५.०१.२०१९ रोजी संबंधीत पुरवठादार यांचे विरोधात न्यायालयीन दावा दाखल करण्यात आला आहे. संबंधित शेतकरी उत्पादक कंपनीने पुरवठादारास देय रक्कम रु.१,१३,६१०/- अदा केलेली नाही. सदर रक्कम महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, धुळे यांच्या खाती जमा केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील कर्जमाफीचे ऑनलाईन फॉर्म भरताना शेतकऱ्यांची आर्थिक लूट केल्याबाबत**

**(४८) ९९८५८ (१०-०१-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात शेतकरी कर्ज माफीचे ऑनलाईन फॉर्म भरताना आपले सरकार, ई-सेवा, सी.स.सी.,या केंद्रामध्ये शेतकऱ्यांकडून रु.२०० शुल्क घेऊन शेतकऱ्यांची आर्थिक लूट केल्याची प्रकरणे निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक प्रशासन यांच्याकडे शेतकऱ्यांनी तक्रार देऊनही कोणतीही कारवाई या सेवा केंद्रांवर अद्यापि करण्यात आली नसल्याची माहिती आढळून आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शेतकऱ्यांची आर्थिक लूट केल्याप्रकरणी या सेवा केंद्रांवरती शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख (३१-१२-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

शेतकरी कर्ज माफीचे ऑनलाईन फॉर्म भरताना आपले सरकार, ई-सेवा, सी.एस.सी. या केंद्रामध्ये श्री.फुगारे या शेतकऱ्यांकडून रू.२००/- शुल्क घेऊन आर्थिक लूट केल्याची तक्रार दिनांक ०४/०९/२०१७ रोजी सहायक निबंधक, मंगळवेढा यांच्याकडे प्राप्त झाली होती.
(२) नाही.

चौकशी अंती सदर तक्रार अर्जात तथ्य नसल्याचे निदर्शनास आले.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दर्यापूर व अंजनगांव (सुर्जी) (जि.अमरावती) तालुक्यात वखार महामंडळाचे गोडाऊन बांधण्याबाबत**

**(४९) १००४१९ (०३-०१-२०१८). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दर्यापूर व अंजनगांव (सुर्जी) (जि.अमरावती) तालुक्यात शेतकऱ्यांना धान्य साठवण्यासाठी गोडाऊन उपलब्ध नसल्याने तसेच धान्याचे नुकसान होत असल्याने कमी भावाने बाजारपेठेत विक्री करावी लागते त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंजनगाव (सुर्जी) येथे शासनामार्फत वखार महामंडळाचे गोडाऊन बांधण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्तप्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख (०४-०१-२०१९) :** (१) दर्यापूर येथे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारात ५३६० मे.टन क्षमतेची गोदामे उभारली आहेत. परंतु, अंजनगांव येथे गोदामे उभारणीसाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाकडे योग्य जमिन उपलब्ध नसल्याने महाराष्ट्र राज्य वखार महामंडळास गोदामे उभारणी करणे शक्य झाले नाही.
(२) व (३) तहसिलदार, अंजनगांव (सुर्जी) यांनी खेल बाबूजी येथील सर्वे क्र.४४ (४.८६ हेक्टर) येथे गोदामासाठी जागा उपलब्ध असल्याचे वखार महामंडळास कळविले आहे. परंतु, सदरच्या जमिनीस जोडणाऱ्या रस्त्यामध्ये शहानूर नदी ओलांडण्यासाठी पूल नसल्याने सदरची जमिन

सध्या गोदाम उभारणीस योग्य नाही. त्यामुळे, पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याची विनंती वखार महामंडळाकडून तहसिलदार, अंजनगांव (सुर्जी) यांना करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मागासवर्गीयांसाठीच्या योजनांच्या लाभाबाबत**

**(५०) १०१६९९ (१२-०१-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीयांसाठीच्या योजनांचा लाभ हा कुटुंबातील किती व कोणत्या अपत्यांपर्यंत मर्यादित असावा याबाबतची मागणी सोलापूर येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) निवेदनात नमूद केलेल्या विषयाच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या विविध विभागांच्या शिष्यवृत्ती, फी प्रतिपूर्ती व निवार्ह भत्ता इ. योजनांची सर्वसमावेशक प्रणालीद्वारे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने, माहिती व तंत्रज्ञान विभागाने सुधारीत स्वरुपात महाडिबीटी प्रणाली माहे, ऑक्टोबर, २०१८ पासून कार्यान्वित केली आहे. सदर प्रणालीवर संबंधित विभागांकडून शिष्यवृत्ती, फी प्रतिपूर्ती व निवार्हभत्ता इ. योजनांच्या अटी व शर्तीमध्ये योजनांचा लाभ किती अपत्यमर्यादेपर्यंत देय राहील, याबाबतचा तपशिल नमूद केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.